## *राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक*

(पिनॅकल मॉल, ४ था मजला, त्र्यंबक नाका सिग्नलजवळ, जुना आग्रा रोड, नाशिक ४२२००२)

---

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार**

**क्र. रामाआ-नाशिक/तक्रार क्र :७२२/२०२१/जळगांव**

| तक्रारदार | प्रतिवादी |
|---|---|
| श्री. शरद प्रल्हाद सुरवाडे,<br>रा. खंडाळा, पो. मोंढाळा,<br>ता.भुसावळ, जि. जळगांव. | ग्रामसेवक,<br>ग्रामपंचायत कार्यालय,<br>खंडाळा, ता. भुसावळ, जि.जळगांव. |

राज्य माहिती आयोग खंडपीठ नाशिक

**सुनावणी दिनांक ३०/०१/२०२४**

तक्रारदार यांनी दिनांक १८/१०/२०२१ रोजीच्या अर्जान्वये राज्य माहिती आयोगाकडे तक्रार अर्ज दाखल केला आहे. त्यामध्ये दिनांक ३०/०१/२०२४ रोजी आयोजित सुनावणीसाठी तक्रारदार व जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत.

२) तक्रारदार यांनी दिनांक १८/१०/२०२१ रोजीच्या तक्रार अर्जात असे नमुद केले आहे की, आयोगाच्या आदेशानुसार जन माहिती अधिकारी श्री. विजय अमरसिंग काकरवाला ग्रामसेवक यांनी माहिती पुरविली नाही.

३) आयोगाने द्वितीय अपील क्रमांक १०७२/२०१९/जळगांव वरील निर्णय दिनांक १३/०७/२०२१ रोजी पुढीलप्रमाणे आदेश दिले आहेत. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत खंडाळा यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांच्या आत अपिलार्थीस त्यांच्या दिनांक १८/०९/२०१८ रोजीच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने त्यांनी मागितलेल्या माहितीसंदर्भात कार्यालयातील उपलब्ध माहिती नोंदणीकृत पोचदेय डाकेने विनामुल्य पुरवावी.

४) सुनावणीपुर्वी प्रस्तुतच्या तक्रार अर्जासंदर्भात संबंधित जन माहिती अधिकारी यांचेकडून मागविण्यात आलेला अहवाल अद्यापही प्राप्त झालेला नाही. त्यामुळे या तक्रारीची वस्तुस्थिती आयोगाच्या निदर्शनास आलेली नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

१) विद्यमान जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, खंडाळा यांनी आयोगाने द्वितीय अपील क्रमांक १०७२/२०१९/जळगांव वरील निर्णय दिनांक १३/०७/२०२१ रोजी पारीत केलेल्या आदेशातील मुद्या क्र. १ ची अंमलबजावणी करावी.

२) आयोगाने द्वितीय अपील क्रमांक १०७२/२०१९/जळगांव वरील निर्णय दिनांक १३/०७/२०२१ रोजी पारित केलेल्या आदेशाचे जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, खंडाळा, ता.भुसावळ यांनी पालन केले नाही. म्हणुन त्यांचे विरुध्द माहिती अधिकार अधिनियम २००५ चे कलम २०(१) नुसार कार्यवाही का करण्यात येऊ नये याचा लेखी खुलासा दि. १३/०७/२०२१ रोजी कार्यरत असणारे जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक ग्रामपंचायत कार्यालय, खंडाळा, ता. भुसावळ यांनी आदेश प्राप्तीच्या

दिनांकापासून १५ दिवसांच्या आत आयोगास सादर करावा. त्यांचा लेखी खुलासा आयोगास प्राप्त न झाल्यास त्यांचे या प्रकरणी काहीही म्हणणे नाही असे गृहित धरुन शास्तीची कार्यवाही कायम करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

३) वरील आदेशांसह प्रस्तुत तक्रार क्रमांक ७२२/२०२१/जळगांव निकाली काढण्यात येत आहे.

(भुपेंद्र गुरव)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ नाशिक

प्रत — माहिती आणि आवश्यक कार्यवाहीसाठी

गटविकास अधिकारी, पंचायत समिती, भुसावळ, ता.भुसावळ, जि.जळगांव

यांना कळविण्यात येते की, आयोगाने पारित केलेल्या आदेशाची प्रत संबंधितांना बजावून आयोगाकडे लेखी खुलासा सादर करण्याबाबत आपल्या स्तरावरुन योग्य त्या सूचना द्याव्यात.

जावक क्र. आ-६७० 26 MAR 2024